कार्यालयीन टिप्पणी

ससं (हप्रनि) विभाग/ मप्रनिमंडळ
दिनांक : [illegible] .०७.२०१२.

विषय : चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रणसाठी वने व पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांचे टर्म्स ऑफ रेफरंसप्रमाणे करण्यात आलेल्या कृती आराखड्याची मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०६/२०१२ रोजी मा.मंत्री पर्यावरण यांचे मंत्रालयातील दालनात झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रणसाठी वने व पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांचे टर्म्स ऑफ रेफरंसप्रमाणे करण्यात आलेल्या कृती आराखड्याची मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०६/२०१२ रोजी मा.मंत्री पर्यावरण यांचे मंत्रालयातील दालनात झालेल्या आढावा बैठकीचे प्रारुप इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर.

इतिवृत्तास मान्यता मिळाल्यानंतर सर्वसंबंधितांना त्याची प्रत पाठविण्यात येईल.

सहसंचालक (हप्रनि)

मा.सदस्य सचिव :-

मा.सचिव (पर्यावरण) :-

मा. मंत्री (पर्यावरण) :-

**चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रणसाठी वने व पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांचे टर्म्स ऑफ रेफरंसप्रमाणे करण्यात आलेल्या कृती आराखड्याची मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखली दि.२१/०६/२०१२ रोजी मा.मंत्री (पर्यावरण) यांचे मंत्रालयातील दालनात झालेली**

**<u>आढावा बैठकीचे इतिवृत्त</u>**

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रणसाठी वने व पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांचे टर्म्स ऑफ रेफरंसप्रमाणे करण्यात आलेल्या कृती आराखड्याचा आढावा बैठक मा. मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखली दि. २१/०६/२०१२ रोजी मा. मंत्री पर्यावरण यांचे मंत्रालयातील दालनामध्ये घेण्यात आली होती. सदर बैठकीस सचिव (पर्यावरण), सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, संचालक (पर्यावरण) व म.प्र.नि.मंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये सर्वप्रथम, कृती आराखड्याचे सद्यस्थिती अहवाल म.प्र.नि.मंडळातर्फे सादर करण्यात आला.

**बल्लारपूर क्षेत्र :-**

१. **मे.बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्ट, बल्लारपूर यांनी केलेल्या कामाची प्रगती -**

- अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करुन, हवा व जल प्रदूषण नियंत्रण सयंत्रणामध्ये सुधारणा करण्याचे नुतनीकरण प्रकल्प उभारण्यास सुरुवात झाली असून, ऑक्टो.,२०१२ पर्यंत कार्यान्वित करण्याची शक्यता आहे.
- AOX, BOD व रंग काही प्रमाणात कमी करण्यासाठी ऑक्सिजन डिलिग्नीफिकेशन व्यवस्था करण्याची कामे पूर्ण झाले आहे.
- अधिकचे थिकनर आणि दूहेरी वायर प्रेस वापरून सध्याच्या ETPचे नूतीकरण काम पूर्ण झाले असून कार्यान्वित आहे.
- मशीनमधील कागद उत्सर्जनाचे रिसायकलिंग करण्यासाठी डिस्क फिल्टर बसविण्याचे काम पूर्ण झाले असून कार्यान्वित आहे.
- पेपरमिल मधील उग्र वास कमी करण्यासाठी NCG (नॉन कंडेंसेबल वायू) चे ज्वलन करण्याच्या व्यवस्थेच्या उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. NCG ज्वलन प्रक्रिया कार्यरत आहे.
- चुनाभट्टीतून बाहेर पडलेल्या $CO_२$ चा उपयोग $CaCO_३$ तयार करण्याचे काम (ग्रीन हाऊसमधील वायू कमी करणे.) पूर्ण झाले आहे व प्लांट कार्यरत आहे.
- चुन्याच्या गाळाचे रिसायकलिंग आणि पुर्नज्वलन करण्यासाठी १८० टन प्रतिदिन क्षमतेची रोटरी चुनाभट्टी उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.
- चुना स्लज डंपींग यार्डवर १ लाख १० हजार वृक्ष लागवड करण्यात आली आहे व प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वृक्ष जगविण्यासाठी वापरण्यासाठी आवश्यक पाईपलाईनचे काम करण्यात आले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वसाहत, चंद्रपूर

**मे. मल्टि ऑरगॅनिक्स प्रा. लि., महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, चंद्रपूर**

सदर उद्योगाने सांडपाणी सनियंत्रण व्यवस्था बसवून कार्यान्वित केलेली आहे व प्रक्रियाकृत सांडपाण्याचा कूलींग टॉवरसाठी पुर्नवापर करण्यात येत असून शून्य निकसन करण्यात येत आहे.

कोल फायर बॉयलर्सला बॅग फिल्टर बसविलेले असून, कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

**गुप्ता कोलफिल्ड्स लि.** : कोल वॉशरी.

- सांडपाणी निर्मीती कमी करण्यासाठी, तसेच घन कचऱ्याच्या रिकव्हरीसाठी हाय फ्रिक्वेंसी स्क्रीन आणि थिकनर बसविण्याचे काम पूर्ण झाले असून सदर व्यवस्था कायान्वित करण्यात आली आहे.

- फाईन्स हॉपरच्या सभोवताली पाईपलाईन्स आणि फॉगी नॉझल्स असलेली रेन गन्स वॉटर स्प्रिंक्लर्सची व्यवस्था केलेली आहे.

**भाटिया इंटरनॅशनल लि.** : कोल वॉशरी.

- औद्योगिक सांडपाणी साठविण्याकरिता अतिरिक्त सिमेंट टँक बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे.

- मुख्य प्रवेशद्वारापासून वजन काटा व रिसिव्हिंग हॉपरपर्यंतच्या अंतर्गत दळणवळण रस्त्याचे काँक्रीटीकरण काम पूर्ण झाले आहे.

<u>**एमआयडीसी ताडाळी क्षेत्र, चंद्रपूर (स्पाँज आयर्न प्लँट) -**</u>

<u>चमन मेटॅलिक्स</u>

- प्रॉडक्ट हाऊस येथे ३ स्टेज बॅग हाऊसची स्थापना, कूलर उत्सर्जनाचे जवळ नवीन बॅग फिल्टरची स्थापना, स्टोअर आणि रॉ मटेरिअल विभागात ०.८ किमी. रस्त्याचे काँक्रीटीकरण ESP १ आणि २ च्या रिक्यूपरेटरचे नुतनीकरण जसे :- RAV तील बदल, पाईप बदल, कास्टेबल व इम्पेलरचे प्लेटमध्ये बदल पूर्ण झाले आहे.

<u>ग्रेस इंडस्ट्रीज</u>

- कोल क्रशर, कोल स्क्रिनिंग सेक्शन आणि आयर्न ओअर क्रशर येथे बॅग फिल्टर स्थापित करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

<u>श्री सिद्धबली इस्पात लि.</u>

- WHRBची उभारणी झाली आहे आणि कार्यरत आहे. ESPS ची दुरुस्तीचे व इलेक्ट्रीक फिल्ड्स बदलण्याचे काम पूर्ण झाले आहे.

गोपानी आयर्न ॲण्ड पॉवर लि.

- FBC पॉवर प्लांटसाठी रॉ मटेरिअल फिडिंग हॉपर आणि ट्रान्स्फर पॉईंटवर बॅग फिल्टर्सची स्थापना व ६ बॅग हाऊसेसची उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

- स्टोअर्सपासून SMS पर्यंत आणि वजन काटा ब्रिजपासून ट्रक टिप्लरपर्यंत कॉंक्रीटीकरण या दोन्ही रस्त्यांचे WBM काम पूर्ण झाले आहे.

एसीसी सिमेंट, घुग्गुस

- अद्यावत तंत्रज्ञानाची स्थापना करुन नविन प्रकल्प उभारण्यात येऊन मार्च,२०११ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे. नुतन प्लांटमधील आधुनिक वायु प्रदूषण नियंत्रण व्यवस्थेमुळे उत्सर्जनाची पातळी ५० mg/Nm$^3$ इतकी राहील.

लॉईड मेटल्स लि., घुग्गुस

- जुने ESP पुर्णपणे निकालात काढून त्याजागी ५०० TPD भट्ट्यांसाठी नविन ESP स्थापन्याचे काम पूर्ण झाले आहे. लम्प आयर्न ओअर क्रशिंग इमारतीजवळ २००००m$^3$ क्षमतेच्या डस्ट कलेक्टरची उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

- १०० x ४ TPD भट्टी - प्रॉडक्ट हाऊसवरील सध्याच्या २०००० m$^3$ क्षमतेच्या डस्ट कलेक्टरच्या जागी नवि ५५,०००m३ क्षमतेचे डस्ट कलेक्टर उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

मे.वे.को.लि., घुग्गुस ओपन कास्ट

- कारगिल चौक, जुने रेल्वे सायडींग, नवीन रेल्वे सायडींग आणि CHP येथे जास्तीच्या रेन गन्सची स्थापना ७९ स्थिर वॉटर स्प्रिंक्लर्स, CHP जवळ २६ मिस्ट टाईट स्प्रिंक्लर्स तर वजन काट्याजवळ ४ स्प्रिंकलर्स बसविण्यात आले आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर

- युनिट क्र. १, २, ३ व ४ साठी अखंड अमोनिया डोझिंगची व्यवस्था पूर्ण झाली आहे. मे.मेक-वेल इंडस्ट्रीज् लि., मुंबई यांना अमोनिया डोझिंगचा वर्क ऑर्डर दिलेला आहे. युनिट क्र.६ साठी कायम व्यवस्थेचे काम पूर्ण झाले असून कार्यान्वित करण्यात आले आहे व युनिट क्र.५ व ७ यांचे काम डिसेंबर २०१२ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

चंद्रपूर शहरासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्र -

- (घरगुती सांडपाणी - ३० MLD) महानगरपालिकेतर्फे UIDS / SMT योजनेअंतर्गत दोन घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (क्षमता ४५.० MLD आणि २५.० MLD)स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच गटारांची व्यवस्थाही करण्यात येईल. पठाणपुरा आणि रहमतागर येथे २ सांडपाणी प्रक्रिया संयंत्रचे बांधकाम जवळपास ८०% पूर्ण झाले आहे. दोन्ही घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेस जोडणारा गटार नाला १८० किमी लांबीचा आहे, त्यापैकी फक्त ४६ किमी नाल्याचे बांधकाम झाले आहे. दोन्ही घरगुती सांडपाणी प्रक्रिया

यंत्रणा आणि नाल्याची बांधणी मिळून एकूण गुंतवणूक ७२ कोटीची आहे व सदर काम ऑक्टोबर २०१२ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**वरील कार्यक्रम कार्यान्वित केल्यानंतरचा सी.ई.पी.आय. इंडेक्स -**

- कमी कालावधीच्या कार्यक्रमानंतर ६३.८९ असणार आहे.
- दीर्घ कालावधीच्या कार्यक्रमानंतर ५०.३६असणार आहे.

चर्चेदरम्यान कृती आराखड्यातील मंडळाचे अखत्यारीतील बहुतांश बाबींची पूर्तता झाली असल्याचे मा.मंत्रीमहोदयांचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच इतर संस्थेने केलेल्या कामाचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात यावा, असे निर्देश दिले. यावर मा.मंत्रीमहोदयांनी झालेल्या प्रत्यक्ष कामांमुळे सी.इ.पी.आय. इंडेक्स किती खाली आला व तसेच पुढील आखलेल्या उपाययोजनांबाबत आराखडा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास कळविण्याबाबत मा.मंत्रीमहोदयांनी सूचना दिल्या.

बैठकीदरम्यान मा.मंत्रीमहोदयांनी बल्लारपूर पेपर मिलच्या विधीमंडळ प्रश्नांचे आश्वासन पूर्तीबाबत तसेच यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील प्रदूषणाचे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने, स्थानिक लोकप्रतिनिधी समवेत २९ जून, २०१२ रोजी पाहणी व बैठक आयोजित करण्याबाबत निर्देश दिले.

मा.सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर केले.

--- ------